प्रकरण ४ थे

## छ. शाहूचे प्रतिनिधी - परशुराम त्र्यंबक

छ.शाहूने सातारा घेऊन ताराबाईच्या बाजूने सातान्याचा किल्ला लढविणाऱ्या परशुराम त्र्यंबक प्रतिनिधीस कैद केले. यानंतर लगेच म्हणजे १२ जानेवारी १७०८ रोजी शाहू महाराजानी सातारा येथे स्वत:ला राज्याभिषेक करुन घेतला. राज्याभिषेकाच्या वेळी त्याने अष्टप्रधानाच्या नेमणूका केल्या. गदारधर प्रल्हाद यास त्याने प्रतिनिधी केले. शाहूने राज्याभिषेकानंतर ताराबाई विरुध्द मोहिम काढून पन्हाळा, विशाळगड जिंकून घेतले. तथापि त्यास रांगणा जिंकून घेता आला नाही. शाहूची ही मोहिम चालू असताना त्याचा सेनापती धनाजी जाधव याचा वडगाव येथे मृत्यू झाला. त्यानंतर अल्पावधीत परसोजी भोसले आणि रायभानजी भोसले[१] यांचेही निधन झाले. अशाप्रकारे शाहूचे खांदे आधारस्तंभ असलेले सेनापती, सेनासाहेब सुभा व प्रमुख सल्लागार यांच्या एका पाठोपाठ एक झालेल्या मृत्यूमुळे शाहूची बाजू फारच दुबळी झाली. दक्षिणेच्या सुभ्याच्या चौथ, सरदेशमुखीच्या सनदा स्वत:ला मिळवण्याच्या शाहूच्या अपेक्षा फोल ठरल्या. याचवेळी ताराबाईने सुरुवातीची आपली कमकुवत बाजू रामचंद्रपंत अमात्य, घोरपडे, खेमसावंत यांच्या साहयाने सावरुन धरली. तीने इ.स. १७१० मध्ये पन्हाळ्याला आपल्या मुलाचे नावाने छत्रपतिपदाची द्वाही फिरवली. पन्हाळा हे कारभाराचे मुख्य ठाणे ठरवून ताराबाईने कोल्हापूर प्रांत, आपल्या वर्चस्वाखाली आणला. आणि साताऱ्यापर्यंत धडक मारण्याचे मनसुबे रचले. अशावेळी शाहूच्या बाजूला कोणीही अनुभवी सेनानी व दूरदृष्टीचा, मुरलेला मुत्सद्दी नव्हता. या पार्श्वभूमीवर शाहूने आपल्या कैदेत असलेल्या परशुराम पंतास आपल्या बाजूस आणण्याचे प्रयत्न केले. त्यात त्यास यश मिळाले. शाहूने परशुरामपंत अमात्य, पेशवे व प्रतिनिधी ही पदे बहाल केली. या

पदावरून परशुरामपंत प्रतिनिधीने शाहूच्या दरबारात केलेल्या कार्याच्या प्रस्तुत प्रकरणात आढावा घ्यावयाचा आहे.

परशुरामपंतास शाहूच्या पदरी पदे :

ताराबाईने पन्हाळा येथे आपले बस्तान बसताच अष्टप्रधानांच्या नेमणुका केल्या. या नेमणुका करीत असताना तिने सुध्दा छ.शाहूचेच धोरण अवलंबिले. वंशपरंपरेने चालत आलेल्या पदांवर त्याच घराण्यातील व्यक्ती नियुक्त करणे, एखादी व्यक्ती जर छ.शाहूकडे नेमली गेली असेल तर त्याच कुटुंबातील दुसरी व्यक्ती आपणाकडे नेमून घेणे, उदा.बहिरोक मोरेश्वर शाहूचा पेशवा होता. तर त्याचाच भाऊ निळो मोरेश्वर ताराबाईचा पेशवा बनला. छत्रपतीचे दोन्हीही वारस मराठा सरदार, मुत्सद्दी व कारभारी यांना आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न करीत होते. या काळात ताराबाईने छ.शाहूच्या कैदेत असणाऱ्या परशुराम त्र्यंबकास आपणाकडे आणण्या विषयी प्रयत्न चालू ठेवले होते. परंतु परशुराम त्र्यंबक त्यास असलेल्या कैदेमुळे किंवा अन्य कारणाने आपणाकडे येत नाही याची खात्री झाल्यानंतर ताराबाईने परशुराम त्र्यंबकाचा पुत्र कृष्णाजी परशुराम यास छ.शिवाजीचे प्रतिनिधीपद बहाल केले.[२] पन्हाळ्यावरून ती रामचंद्रपंत अमात्य याच्या मदतीने छ.शिवाजीचा राज्यकारभार चालवू लागली.

या काळात छ.शाहूची परिस्थिती अत्यंत बिकट झाली होती. त्याच्याकडे खंडोबल्लाळ चिटणीस व बाळाजी विश्वनाथ हे दोनच निष्ठावान व विश्वासू कारभारी होते. अशा परिस्थितीत खंडोबल्लाळ चिटणीसामार्फत परशुराम त्र्यंबकाचे मन वळविण्याचा प्रयत्न सुरू झाला. बाळाजी विश्वनाथाने सुध्दा परशुरामपंतास शाहूच्या पक्षात आणण्या विषयी प्रयत्न करून छ.शाहूचे ही मन वळविले असावे असे वाटते.

परशुराम त्र्यंबक जवळ जवळ तीन वर्षे कैदेत होता. पंतप्रतिनिधीच्या बखरीतील उल्लेखा प्रमाणे तो या काळात परळीच्याच किल्ल्यावर असावा. हे म्हणणे संयुक्तिक वाटते.[3] हा कैदेचा काळ पंतास त्रासाचा व दु:सह वाटला असावा. याच काळात त्याचा मुलगा कृष्णाजी परशुराम याची छ. शिवाजीचा प्रतिनिधी म्हणून ताराबाईने नेमणूक केली. या वर्तमानाने परशुरामपंताचे मन छ. शाहूच्या बाजूस हळूहळू अनुकूल होत गेले. आपण ही आता कांही तडजोड करुन छ. शाहूच्या पक्षात रूजू होऊन होईल ती सेवा करावी अशी सहज इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाल्यामुळे त्यांनी खंडोबल्लाळ चिटणीस याच्या प्रयत्नास अनुकूल प्रतिसाद दिला असावा असे अनुमान करता येते. हा काळ छ. शाहूस राजकीय व आर्थिकदृष्टया सुध्दा आणीबाणीचा होता. यावेळी परशुराम त्र्यंबकाने कैदेत असतानाही छ. शाहूस साहय केल्याचा उल्लेख ब्रह्मेंद्र स्वामीच्या चरित्रात मिळतो तो असा -
" म्रटी [गदारबार प्रल्हाद] कारभार यथास्थित बंदोबस्त न होय. एका तर परशुराम कैदेत असता महाराजांचे खर्च वेचाचे साहित्य केले. न्यून पडो दिले नाही. हे लक्ष महाराजानी समजून पदायोग्य मनुष्य जाणून ठेवले."[4] या व अशा अनेक घटनामुळे अगोदरच क्षमाशील असणाऱ्या छ. शाहूचे मन परशुराम पंताविषयी साफ झाले असावे. अशाप्रकारे परशुराम त्र्यंबकाचे मन वळविण्याचा व तडजोडीचा प्रयत्न सुरू असतानां त्याचा शाहूसी काही पत्रव्यवहारही झाला असावा असे दिसते. परशुराम त्र्यंबकाने छ. शाहूस पाठवलेले एक पत्र उपलब्ध आहे. ते अभ्यासल्यानंतर परशुराम त्र्यंबकाच्या मनाची अवस्था तसेच त्याच्या छ. शाहूशी असणाऱ्या संबंधाची कल्पना येते. परंतु प्रस्तुतचे पत्र हे परशुराम त्र्यंबकाने ताराबाईस लिहिले आहे असे मत अ. ना. भागवत यांनी त्यांच्या सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास" या ग्रंथात नमूद केले आहे. परंतु प्रस्तुत पत्रातील मजकुराचा आशय, पत्रात केलेली शब्द योजना पत्र लेखनाचा लेखकाचा हेतू, इ. सर्व गोष्टीचा साकल्याने विचार केला तर अ. ना. भागवतांचे मत चुकीचे ठरते व हे पत्र परशुराम त्र्यंबकाने छ. शाहूसच लिहले आहे हे स्पष्ट होते. जिज्ञासूना सदरचे पत्र पाहून यासंबंधी स्वत:चे

मत बनवीता यावे म्हणून ते पत्र विस्तृत व दीर्घ असूनही जसेच्या तसे येथे देत आहे.

" श्री आई आदिपुरुष "

" विनंति उपरी स्वामीनी दया करून राजश्री तिमाजी पंत व धनाजी घाडगा यांस समागमे पत्र पाठविले. ते केवळ आपली वचने हे सांगतील ते म्हणून स्वामीनी लिहिले. पत्रार्थ व निरोप ऐकून बहुत समाधान वाटले. स्वामींच्या निरोपाचे प्रतिउत्तर त्रिवर्गाजवळ सांगीतले आहे. ते निवेदन करतां चित्तारूढ होईल. स्वामींनी आज्ञासांगोन पाठविली तदनुरूप श्रीवरील पुष्पे व रोटी ऐशी शपथ पाठविली आहे. स्वामींनी एक तिळतुल्य चित्तांत आजसारखी गोष्ट येऊं न द्यावी. आपचे चित्त निखालस स्वामीच्या पायाशी आहे. परिणामीही कळो येईल. हे जीवित आहे ते केवळ स्वामींच्या अन्नाचे आहे. त्याहीमध्ये ह्या प्रसंगी केवळ आमच्या जीविताचेच आदान होते. परंतु स्वामी प्रसंगी होते. स्वामींनी दया करून प्राण वाचविला. हे गोष्टीचा कृतोपकार आहे. जोंवरी आयुष्य असेल तो विसर पडणार नाही. स्वामींनी आमचा सर्वस्व अभिमान धरिला. तरी जे आमचे वंशजपण असेल तदनुरूप उत्तीर्ण होऊन श्रीकरील तरी स्वामीची कीर्ति दिगंबरी प्रसार व्हावी. ऐसाच अर्थ होईल हे स्वामीस पूर्ण भरवंसा असावा. या उपरी स्वामीनी कांही मनांत संदेह येऊ नेदून पत्री संदेहास्पद लिहित न जावे. स्वामींचे आमपण आहे ते स्वामी करतात. आम्ही अधम कृति चित्ती आणली ती इहलोकी निंद्य, परलोकी तो विश्वास घात करते " नरो नरकं याति यावत् चंद्रदिवाकरौ." हा प्रसंग जो अधमपणा करील त्याचे पदरी पडेल. स्वामींनी विमल हस्तें श्री पूजिली आहे. तावत्काल पावेतो अभिमान आहेच ऐसाच प्रसंग आहे. या विशी विशेष लेखन करावे तरी पत्रार्थ विशेष वाढतो. राजश्री रायभानजी राजे व आपण हे गोष्टी अंगीकार केला आहे. त्यामुळे बहुतांचे द्वेष पदरी म्हणून स्वामींनी लिहिले . तरी राजश्री रायभानजीराजे आणि स्वामी ऐसे आम्ही दोन्ही लक्षीत नाही. त्याहीमध्ये या प्रसंगी त्यांही दया केली याहून

उत्तम ते काय आहे ? उभयतांनी हे गोष्टी अंगिकारली. स्वामीस ऐसे पुरते चित्तांत येऊ द्यावे की, या गोष्टींनी स्वामीची व त्यांची कीर्ति बहुत होते. आणि स्वामींनी आपला पाठिंबा उभा केला. ऐसे चित्तांत येऊं द्यावे कीं, वरकडाचे द्वेष पदरी पडतात म्हणून लिहिले तरी श्रीसमर्थ आहे. स्वामी, आम्ही आणा रायभानजीराजे ऐसें एकचित्त असणं जरी आभाळ पडत असेल, त्यास हात देऊं. तेथे वरकड प्रसंग ते काय आहेत ? स्वामीस काय न कळेसा प्रसंग आहे ? तो विशद लेखन करूं. स्वामींनी तो तवकल आमचेविशी केलेच आहे. त्यास श्रीस्वामीस उत्तर काय ? यश पदरी घालते ऐसा पुरता भरवसा असो दिला पाहिजे. आपण स्वामीस मल्हारराऊ सेना घेऊन चिपळुणास येणार, याजनिमित जातो. तुम्ही आहा तैसें आठ पंधरा दिवस असणे. बहुतसा राबिता होऊं न देणे. या दोनीच्या विचारे असले पाहिजे म्हणून स्वामीनी लिहिले. तरी स्वामींनी पूर्वी जे रितीने ठेविले, त्या रितीने दोन मास क्रमिले. या उपरी जे रितीने आज्ञा केली. तदनुरूप रहाटी करूं. परंतु स्वामींची दया जालिया उपरी किंचित भाग राहिला तो राहू देणे, हे उचित नाही. वरकडाचे उपरोध स्वामींनी किमपि चित्तात येऊं न द्यावी. याहीमध्यें जे स्वामी आज्ञा करितील तद्नुरूप रहाटी केली जाईल. स्वामींनी लिहिले की, आठ पंधरा दिवस त्यांस हे पत्र स्वामीपाशी पावेतो आठ दिवस जाले. एका शब्दाचा तो नियता वारला. दुसरे शब्दास आठ दिवस अवकाश लागतो. स्वामींनी यामध्ये श्री प्रेरील ते करावे. परंतु आतां उचित आहे की - आमचा श्रमपरिहार सत्वर करावा, हे उचित आहे. स्वामींनी लिहिले की, भोजन करून खुशाल असणे. तरी स्वामींची दया जावी तेधवां खुशालच आहो. भोजन श्रीचे आणि स्वामीचे पाय पाहूत धवां होईल. फराळ घेतो. खुशाल स्वामीचे पत्र पाहून आहो वरकड साकल्य वर्तमान त्रिवर्ग सांगता कळो येईल. कृपा असो दीजे विनंति."

हे पत्र परशुराम त्र्यंबक यांनी ताराबाईस लिहिले होते असे अ.ना. भागवत नमूद करतात व तसे गृहित धरूनच पत्रातील मजकुराचा अर्थ ओढून ताणून

लावण्याचा प्रयत्न करतात ते स्पष्ट जाणवते. त्यांच्या स्पष्टीकरणा नंतरही हे पत्र ताराबाईस लिहिले होते असे मानल्यास कांही प्रश्न उरतात- ते म्हणजे [१] " स्वामींनी आज्ञा तांम्रेन पाठविली तदनुरुप श्रीवरील पुष्पे व रोटी शेरी शपथ पाठविली आहे" ताराबाईस परशुरामपंताने एकदा दूध भाताची शपथ दिलीच होती व त्यामुळेच त्यांनी छ.शाहूंना छोडच्या लढाईत व सातारा किल्ल्यावर विरोध केला होता. त्यामुळेच त्यांच्या नशिबी कैद आली होती. व ती तो भोगत असतानाच पुन्हा ताराबाईस शपथ देण्याचे प्रयोजन काय ? उलट अशी शपथ शाहूस देणे गरजेचे होते. तरच कैद संपून सेवा मिळणे शक्य होते.

[२] " त्याहीमध्यें हया प्रसंगी केवळ आमच्या जीवितांचंच आदान होते. परंतु स्वामी प्रसंगी होते. स्वामींनी दया करुन प्राण वाचविला. हे गोष्टीचा कृतोपकार आहे जोपरी आयुष्य असेल तो विसर पडणार नाही" येथे ताराबाईच्या सानिध्यात जीवित आदान होण्याचा कोणता प्रसंग घडला? पुन्हा त्यांनी पंतांचा जीव वाचविला ? हे छ.शाहूच्या संदर्भातच योग्य होय. कारण सातारा किल्ला घेतल्यानंतर एका जुन्या बखरीतील उल्लेखाप्रमाणे शाहूने त्यांचे डोळे काढण्याची आज्ञा दिली होती. पण पुन्हा त्यांना जीवदान दिले.[६] त्यामुळे शाहूचेच आजन्म उपकार परशुरामपंतावर होते. त्यामुळे वरील विधाने परशुरामपंताने शाहू संदर्भातच केली असणे शक्य आहे.

[३] " आंम्ही अधर्मकृती चित्ती आणली ती इहलोकी निंद्य " ताराबाईच्या संदर्भात अशी कोणती धर्मकृती परशुराम त्र्यंबकाने केली होती ? उलट आजपर्यंत ते ताराबाईशीच एकनिष्ठ होते. त्यांच्याच पक्षाचा पंताना पाठपुरावा केला होता. पण परशुरामपंतानी छ.शाहू विषयी मात्र अधर्मकृती चित्ती आणली होती हे इतिहासच सांगतो.

[४] " स्वामी, आंम्ही आणि रायभानजीराजे ऐसे एकचित्त असतां जरी आभाळ पडत असेल. त्यास हात देऊ तेथे वरकड प्रसंग ते काय आहेत ?"

येथे रायभानजी राजेयाचा उल्लेख आहे. रायभानजी राजे भोसले हा ताराबाईच्या बाजूस कधिच नव्हता. उलट शाहूची सुटका झाल्या पासून तो शाहूचा प्रमुख सल्लागार होता. शाहूच्या सुटकेनंतर सुरुवातीची दोन वर्षे म्हणजे रायभानजीच्या मृत्यूपर्यंत शाहू त्याच्याच सल्ल्याने वागत होता. त्यामुळे वरील उल्लेख शाहू व रायभानजीराजे भोसले यांच्या संदर्भातच असावा हे अगदी स्पष्ट होते. दुसरे म्हणजे रायभानजीच्या उल्लेखावरुन परशुराम त्र्यंबकाने हे पत्र शाहूस रायभानजी राजाच्या मृत्यूपूर्वी म्हणजे २३ ऑगस्ट १७०९ पूर्वी लिहिले असावे हे निश्चित होऊन पत्राचा काळ स्थूलमानाने ठरविता येतो.

[५] " आमचा श्रमपरिहार सत्वर करावा हे उचित आहे " परशुराम त्र्यंबक कैदेतून पत्र लिहित आहे म्हणजे कैदेतून मुक्तता मिळणे व सेवेत रुजू करुन घेणे हाच श्रमपरिहार येथे संभवतो. परशुरामपंतास ताराबाईस अशी विनंती करण्याचे कारण नव्हते, तर ही विनंती पंताने छ.शाहूसच केली असावी. हे पत्र पंताने परळी येथे कैदेत असताना छ.शाहूस लिहिले आहे. वरील सर्व मुद्यांचा विचार केल्यानंतर परशुरामपंताने हे पत्र छ.शाहूस इ.स. १७०९ मध्ये ऑगस्ट पूर्वीच लिहले असावे हे स्पष्ट होते.

वरील पत्रात परशुराम त्र्यंबक याने छ.शाहूस शपथ देऊन श्रमपरिहाराची इच्छा प्रदर्शित केली आहे. त्या अर्थी परशुराम त्र्यंबकाच्या मनाची छ.शाहूस मिळण्याची पूर्ण तयारी झाली होती असे मानावयास हरकत नाही. तथापि शाहूच त्यास आणखी कांही दिवस थांबण्यास सांगत होता.

अशाप्रकारे खंडोबल्लाळ चिटणीस याच्या मध्यस्थीला यश आले होते. परंतु निर्णायक तडजोड होत नव्हती. असे पत्रातील पुढील मजकुरा-वरुन दिसते. तो मजकूर असा - " परंतु स्वामींची दया जालिया उपरी किंचित भाग राहिला. तो राहू देणे हे उचित नाही. वरकडाचे उपरोध स्वामींनी किमपी चित्तात येऊ न द्यावी. याहीमध्ये जे स्वामी आज्ञा

करितील तदनुरुप रहाटी केली जाईल."

यातून असा अर्थ ध्वनित होतो की, तडजोडीत एकमेकांच्या कांही अटी असाव्यात व त्यात परशुराम त्र्यंबकास त्याचे पूर्वीचेच प्रतिनिधीपद छ.शाहूने त्यास द्यावे. अशी प्रमुख अट असावी. या संदर्भात पंतप्रतिनिधींच्या बखरीत महत्वाचा उल्लेख आहे. तो असा - " शाहूने परशरामपंताकडे बोरगावकर चिटणीस यासी परळी किल्ल्यास पाठवून परशरामपंत यास विचारले त्यांणी सांगितले की, आमचे सर्व अपराध क्षमा करुन आमचे पद आम्हांस द्यावे."[७] म्हणजे परशुरामपंत हे प्रतिनिधीपद मागत होते तर छ.शाहू ते पद सहजासहजी त्यास देऊ इच्छित नव्हते. हे स्पष्ट होते. शाहू प्रतिनिधिपदा ऐवजी त्यास दुसरे एखादे म्हणजे "अमात्य" किंवा "पेशवेपद" देऊ इच्छित असावेत. म्हणून परशुरामपंत म्हणतात की - " स्वामींची दया जालिया उपरी किंचित भाग राहिला तो राहू देणे हे उचित नाही" पण असे असले तरी त्याच्या पुढील विधानावरुन स्पष्ट होते की तो प्रतिनिधीपदा शिवाय सुध्दा सरते शेवटी छ.शाहूच्या इच्छेने वागावयास तयार होता. कोणतेही पद स्विकारण्यास तयार होता. त्या संदर्भातील विधान असे " याहिमध्ये जे स्वामी आज्ञा करितील तदनुरुप रहाटी केली जाईल "

" ताणावयाचे परंतु तुटू द्यावयाचे नाही " हे परशुरामपंताच्या तडजोडीचे सूत्र दिसते. ते त्याच्या चतुरपणास व मुत्सद्देगिरीस साजेसेच आहे. तसेच छ.शाहू सुध्दा पदे व हुद्दे यांची खैरात वाटत होते. असे नाही हे येथे स्पष्ट होते.

धनाजी जाधव, परसोजी भोसले यासारखे सरदार मृत्यू पावल्यामुळे शाहूची जी बिकट अवस्था निर्माण झाली. त्यामुळे त्याने परशुरामपंताना सुरुवातीस अमात्य पदावर रुजू करुन घेतले असावे. रियासतकार सरदेसाईच्या मते याचे कारण असे की " हे अमात्यपद शाहूने परशुरामपंतास दिले ते

रामचंद्रपंतास मुद्दाम हिणवण्यासाठी असावे. परशुराम त्र्यंबकाने छ.शाहूचे अमात्य म्हणून कांही दिवस काम केल्यानंतर छ.शाहूने पुढे त्यास इ.स. १७१० मध्ये अल्पकाळ पेशवेपद दिले असावे.[८]

इ.स. १७१० मध्ये शाहूवर सर्व बाजूने संकटे उभी राहिली. त्या काळात त्याच्या अष्टप्रधान मंडळातील प्रधानानी ज्या तडफेने कामे करणे आवश्यक होते त्या तडफेने त्यांच्या हातून कामे झाली नाहीत. प्रतिनिधी म्हणून काम करणाऱ्या गदाधर प्रल्हाद याच्या हातून राज्यकारभार रेटत नाही. ही गोष्ट याचवेळी छ.शाहूच्या नजरेस आली. छ.शाहूने आपले निष्ठावंत हितचिंतक खंडोबल्लाळ वगैरेंच्या बरोबर चर्चा करून अखेरीस परशुराम त्र्यंबकास त्याच्या पूर्वीच्या प्रतिनिधीपदावर रुजू करून घेण्याचे ठरवले. छ.शाहूने गदाधर प्रल्हाद याच्याकडील प्रतिनिधीपद काढून घेऊन ते १६ डिसेंबर १७१० रोजी परशुराम त्र्यंबक यास दिले.[९]

परशुराम त्र्यंबक यास छ.शाहूने प्रतिनिधिपद व त्याची वस्त्रे दिली त्यावेळची त्याची मुद्रा पुढील प्रमाणे होती.

श्री

श्री आई आदिपुरूष .
श्री राजा शाहू छत्रपति स्वामी कृपानिधि ।
तस्य परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी ।।[१०]

याचवेळी परशुराम त्र्यंबक प्रतिनिधीस पुढील प्रांत व किल्ले देण्यात आले.

<u>मुलुखगिरी सुभे हाय :</u>

१. प्रांत – राजापूर. १ प्रांत – दाभोळ. १ प्रांत – महिपतगड. १ प्रांत – जावळी. १ प्रांत – मंगळगड. १ प्रांत – वाई. १ प्रांत – सातारा

१.प्रांत – क-हाड. १ प्रांत – व्याघ्रगड. १ प्रांत – मलकापूर. १ प्रांत – पन्हाळा. १ प्रांत – तारळे. १ प्रांत – कोल्हापूर. १ प्रांत – खटाव. १ प्रांत – माण. १ प्रांत – मिरज. असे एकूण प्रांत १६.

किल्ले हाय :

१ किल्ले – विशाळगड. १ महिमतगड. १ प्रचितगड. १ सारंगड. १ जयगड. १ व्याघ्रगड. १ महिमंडनगड. १ रसाळगड. १ सुमेरगड. १ महिपत गड. १ मकरंदगड. १ प्रतापगड. १ मंगळगड. १ मदनगड. १ जंजिरे. १ रत्नागिरी. १ कमळगड. १ पांडवगड. १ वैराटगड. १ वंदनगड. १ चंदनगड. १ कल्याणगड. १ वर्धनगड. १ संतोषगड. १ महिमानगड. १ वारीगड. १ भूषणगड. १ सातारा. १ सज्जनगड. १ सुंदरगड. १ गुणवंतगड. १ वसंतगड. १ पन्हाळा. १ पावनगड. १ मगनगड. १ कोट कोल्हापूर. एकूण किल्ले ३५.

याप्रमाणे मुलुख व किल्ले छ.शाहू महाराजांनी परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी यास दिले.[११]

अशाप्रकारे छ.शाहूने परशुरामपंतास प्रतिनिधिपदाची वस्त्रे, मुद्रा, मुलुख व किल्ले म्हणजेच सरंजाम देऊन त्यास आपलेसे केले. परशुराम त्र्यंबक इ.स. १७१० मध्ये छ.शाहूचा पहिल्यांदाच प्रतिनिधी झाला. परशुरामपंताकडे फार मोठा पूर्वानुभव होता. तसेच तो फक्त सरदारच नसून एक श्रेष्ठ दर्जाचा मुत्सद्दी सुध्दा होता. हे त्याचे गुण मराठयांच्या स्वातंत्र्य युध्दाच्या वेळी दिसून आले होते.

परशुरामपंत प्रतिनिधी आता छ. शाहूचा प्रतिनिधी झाला होता. परंतु त्याच्या कार्यात पूर्वीची तडफ, कार्यतत्परता व क्षमता दिसत नव्हती.

पुन्हा कारावास :

परशुरामपंताने प्रतिनिधी म्हणून छ.शाहूची सेवा करण्यास सुरूवात केली. पण एक वर्षाच्या आतच छ.शाहूने त्याचे प्रतिनिधीपद काढून घेतले.

त्याच्या दुर्दैवाने त्यास पुन्हा छ.शाहूच्या कैदेत पडावे लागले. छ.शाहूने त्याचे सर्व गुन्हे माफ करुन त्यास प्रतिनिधीपद दिले होते. असे असताना एक वर्षाच्या आतच पंतास पुन्हा कैद का भोगावी लागली.१ याची अनेक कारणं संभवतात. त्या कारणांचा येथे आढावा घेणे अगत्याचे आहे.

परशुराम त्र्यंबकाने १६ डिसेंबर १७१० रोजी प्रतिनिधीपद स्वीकारले. पण त्याचे हे पद छ.शाहूने २० नोव्हेंबर १७११ मध्ये काढून घेतले.[१२] म्हणजे पंताकडे ते पद एक वर्षभरही नव्हते. या अल्प म्हणजे ११ महिन्याच्या काळात त्याच्याकडून घडलेल्या कार्यासंबंधी कांही संदर्भ आढळतात. या काळात परशुरामपंताने दादाशेट बिन गोविंद शेट बायकुळा यास विशाळगड वेढयाच्या वेळी त्याने स्वामी सेवा एकनिष्ठेने केली म्हणून छत्रपतीच्या सम्मतीने प्रभानवल्ली प्रांतात सरमहाजनकीचे वतन दुमाला करुन दिले. तसेच ब्रह्मेंद्रस्वामीस त्याने त्याच्या महिपतगड तर्फेचे मौजे डोरले व महातुंगे ही दोन्ही गावे इनाम करुन दिली.[१३]

याप्रमाणेच चिमाणाजी, आबाजी व प्रल्हाद बल्लाळ शेणवी प्रभावळीकर ह्यांना परगाणा वल्णचे नाडगौडकीचे वतन दिल्याबद्दलचे पत्र त्या प्रांताचा हवालदार व कारकून रामजी विश्वनाथ यास १० जून १७११ रोजी लिहिले. या पत्रांनंतर सातच दिवसांनी म्हणजे १७ जून १७११ रोजी अंताजी बल्लाळ व गोपाळ विठ्ठल खांडेकर यांना जमीनी इनाम दिल्याबद्दल ती त्यांच्याकडे चालवण्या विषयीचे पत्र मलकापूर प्रांताचा सुभेदार व कारकून चिमाणाजी बल्लाळ या लिहिले आहे.[१४] हे काम त्याच्या हातून या अल्प काळात घडल्याचे दिसते.

छ.शाहूस अनेक संकटाना तोंड द्यावे लागत होते. ताराबाई पन्हाळयास स्थिर व बळकट झाली होती. शाहू पक्षाच्या सरदारांना फितवण्याचे तिचे काम सुरु होते. धनाजी जाधवाच्या मृत्यूनंतर छ.शाहूने त्याचा पराक्रमी मुलगा चंद्रसेन जाधव यास आपला सेनापती नेमले. पण चंद्रसेनने धनाजी जाधवा-

प्रमाणे नेटाने छ.शाहूचा पुरस्कार केला नाही. त्याच्या वागण्यात शाहूस सुध्दा निष्ठा दिसत नव्हत्या. तर धरसोड दिसत होती. त्यामुळे त्याच्यावर विसंबून राहणे शाहूस धोक्याचे वाटून त्याने बाळाजी विश्वनाथास "सेनाकर्ते" पद देऊन फौज जमविण्याची आज्ञा केली.

बाळाजी विश्वनाथास सेनाकर्ते पद मिळाल्यामुळे चंद्रसेन जाधवास हे आपल्या अधिकारावर अतिक्रमण वाटू लागले. चंद्रसेना बरोबरच इतर मराठा सरदारांना सुध्दा ही गोष्ट मानवली नाही. ताराबाईस ही गोष्ट व सरदारांच्यातील चलबिचल कळताच तिने या संधीचा फायदा घेऊन अनेक मराठा सरदारांना शाहूपासून फोडण्यासाठी पत्रे पाठविली. ताराबाईच्या या खटपटीस यश येऊ लागले. तिने शाहूचा सेनापती चंद्रसेन जाधव यास ही फोडण्याचा प्रयत्न सुरु केला. तो शाहूवर रूठ झाला असल्यामुळे या फितव्याचे नेतृत्व करु लागला. ताराबाईचा रंभाजी निंबाळकर दमाजी थोरात, संताजी पांढरे इ.सरदाराबरोबर अगोदर पासूनच पत्रव्यवहार सुरु होता. आता तो चंद्रसेन जाधवा बरोबरही सुरु झाला. चंद्रसेन जाधवाने हैबतराव निंबाळकर, केरोजीपवार इतकेच नव्हे तर छ.शाहूचा खुद्द प्रतिनिधी परशुराम त्र्यंबक यास सुध्दा या कटात सामील करून घेतले. याबाबतचे उल्लेख ताराबाईने चंद्रसेन जाधवास जे एक विस्तृत पत्र लिहिले आहे त्यात आढळतात. या पत्रातील मजकूरावरून या काळातील मराठे सरदार व मुत्सद्दी याच्या वर्तनाचे व स्वार्थीपणाचे चित्र स्पष्ट दिसते. हे पत्र विस्तृत असले तरी अस्सल व महत्वाचे असल्यामुळे अभ्यासनीय आहे. म्हणून ते पुढे देत आहे. या पत्रात परशुराम पंत प्रतिनिधी विषयी बराच मजकूर आहे. हे पत्र २४ ऑगस्ट १७११ रोजी ताराबाईने चंद्रसेन जाधवास लिहिले आहे. ते पुढील प्रमाणे -

श्री

" धाकटे शिवाजी महाराज याचे पत्र जयसिंग जाधवराव सेनापती जफतन मुलुख यांस -

स्वस्ति श्री राज्याभिषेक शाके ३८ वर संवत्सरे अधिक भाद्रपद बहुल सप्तमी भृगुवासरे क्षत्रिय कुलावंतस श्री राजा शिवछत्रपती यांणी समस्त सेनाधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री जयसिंग जाधवराव सेनापति जफतन मुलूख यास आज्ञा केली ऐसीजे :- तुंम्ही विनंतीपत्र शुध्द एकादशीचे पाठविले ते काल बळी गुरुवारी प्रविष्ठ जाहले. सारांश लिहिला की, आपली निष्ठा स्वामीच्या चरणी, स्वामीची सेवा करावी आणि यश कीर्ति संपादावी. दुसरे, राजश्री जाधवराव हे स्वामींच्या पाया व्यतिरिक्त दुसरे दैवत जाणत नव्हते. राज्यांत दुही निर्माण जाहली. ते प्रसंगी त्यांनी प्रतिज्ञापुर:सर स्वामी सन्निध बोलोन स्वार जाहले. परंतु कालगतीने सर्वांची बुध्दि एका प्रकारे जाहली. तन्मुळे त्यांचा हेतु पूर्ण करावा हे अंत:करणी धरुन आजीपर्यंत याचमानी राहून राजश्री आप्पाजी थोरात, दामजी थोरात शाहाजी निंबाळकर, संताजी पांढरे आदिकरुन सामील करुन घेऊन, शाहूंनी केल्या लोभाची आस्ता न धरितां, त्यांसी वैमनस्य दर्शवून राजश्री परशराम पंडित प्रतिनिधी व राजश्री खंडेराव दाभाडे स्वामींच्या लोभाचे सेवक हया प्रसंगात असावे. या अर्थे आपल्या समाधानास या उभयतास पाठवणे म्हणोन मुद्दाम सांगोण पाठविला. त्यावरुन उभयतास व राजश्री मानसिंग मोरे यास शाहूंनी पाठवून दिल्हे. त्यांच्या व आमच्या भेटी जाहल्या. व राजश्री हैबतराव निंबाळकर सरलष्कर आले. यांचीही भेटी जाहली. तो अगोदर आपण व राजश्री थोरात, खंडेराव दाभाडे, संताजी पांढरे, बसोन घाट घातला होता. तो लष्कर यास सांगताच त्याचे चित्ती हेच होते. मग हे व आम्ही अवघे वर्तमान सरदार कटीत घेऊन राजश्री परशराम पंडित प्रतिनिधी यास विचारांत घेतले. त्यांस स्वामींची द्वाही फिरवली. खुशाली केली, आणि गडकिल्ल्यास आंम्ही आपली व पंडित मशार निल्हेंची पत्रे पाठविली आहेत. हा उपरी नीट सातारियारवाले चालोन जाऊन राज्यांतील दुही नि:शेष करितां स्वामीनी खुशाली केली पाहिजे म्हणोन हे वर्तमान विशद लिहिले. ते श्रवणगोचरे करुन संतोषातिशय जाला. तो पत्रारुढ किती काय म्हणोन करावा ? कार्यकर्तव्य पराक्रमी मायेचे हिंदूसेवक असावे

ते तुंम्हासारखेच कृकर्ते असावे. पूर्वोत्तर स्वामींचे कृपेचा अर्थ व राजश्री जाधवराव यांणी कैलासवासी राजश्री स्वामीचे वेळेपासोन राज्याभिवृध्दी विषयी केले, श्रमसाहस व संपत दुहीमुळे राज्याभिवृध्दीस जाला अपाय चित्तांत आणून पुढे स्वामीचे राज्यवृध्दीचे पावून महाकीर्ति संपादावी, हे मनी धरून हे महत्कार्य सिध्दीते पाववून जो अर्थ विशदे लिहिला तो उचित व याथार्थीच लिहिला तरी तुम्ही दीर्घ दृष्टेच आहां. हे राज्य समग्र तांब्राकांत जाले असतां कैलासवासी स्वामींनी लहानापासून थोरात आपली माया लावून अवधियांवरी सदयत्वे कृपामृत वृध्दि करून दिनप्रतिदिनी राज्य वृध्दिगंत पावविले. ते प्रसंगी कैलासवासी स्वामींचे संपूर्ण कृपेस पात्र एक जाधवराव जाले, ते ते आपल्या कर्तृत्वावारी व हुकूम बारदारी एक निष्ठे-वरी जाले. राज्याभिवृध्दी विषयी त्यांही कांही सामान्य कसाला श्रम-साहस केला नाही. जीविताची तमा न धरिता स्वामिकार्यीच तत्पर राहून कैलासवासी स्वामींनी जे समयी हुकूम केला ते समयी कर्नाटकात फौजांना धावोन जाऊन, कैलासवासी स्वामीस प्राप्त जाली. संकटे निरसर करून स्वामिगौरवाचे सुख त्याहीच अनुभवले. व सेवाधर्मेकडून त्याहींच कैलासवासी स्वामींस संतुष्टविले. तेव्हा कडून कैलासवासी स्वामीस मल्हारनिल्हेविना दुसरे प्रिय की प्राण [कोणी] होते असे नाही. सर्वप्रकारे कार्यास येतील हा भरंवसा दृढ मनी माजिला होता. तदनुरूपच राव मल्हारनिल्हेंनी स्वामीचे चरणी चित्तालय करून औरंगजेबासारीखा मोठा शत्रू राज्यांत पसरला असता. आपल्या शूरत्वाच्या व कर्तेपणाच्या योगे शत्रूचा हिसाब न धरिता राज्याच्या संरक्षणार्थ असाधारण कसाला केला. स्वामींच्या तपोबलप्रमाणेंकडून शत्रू पराभव पावविल्याचे यश मल्हारनिल्हेस प्राप्त जाहले. तदनंतर समुद्रवलयांकित अवनिमंडल निष्कटंक करून स्वामीचे शासन चालवावे, आणि कृतकार्य व्हावे हा हेतू मल्हारनिल्हेनी धरून, हुजूर येऊन मनसबा योजिला. तो दुहीचा प्रसंग प्राप्त जाहला. ते समयी स्वामीस दुसरा कोणाचा भरंवसा होता की काय? दुही निःशेष करावी हे अंगेअणी राव मल्हारनिल्हेंनी करून प्रतिज्ञापुरःसर

स्वामीचे सेवेशी संतोषकारक व हौश जाणून स्वार होऊन गेले. त्यास वैपरित्य कालवशे व सर्व लोकांस एक प्रकारे मोह प्राप्त जाहला. तन्मुळे राव मशारनिल्हे यांचा वृत्तसंकल्प सिध्दीते न पावला. त्यांचे पुत्र तुंम्ही, त्याचसारिखे दुसरा निज आहां. तुंम्हा वितिरिक्त त्यांचा संकल्प शेवटास ने णे आणखी कोण्ग करू पहातो ? व दुहीमुळे राज्याभिवृध्दीस अपाय जाला. हा विचार मायेच्या सेवकांविना दुसरियाचे मनांत येऊ पहातो की काय ? ज्यास यशाकीर्ति संपादने अगत्य, यासच हा विचार. ते तुंम्ही मायेचे यशाकिर्ति लक्षीत सेवक म्हणूनच हा दीर्घदृष्टीचा विचार तुमच्या चित्तात आला, आणि रावसाहेब जाधवराव यांचा कृतसंकल्प दुही नि:शेष करून समुद्र वलयांकित पृथ्वीत स्वामीचे शासन चालवून कृतकार्य व्हावेंचा होता, तो सफल करावा. या उदित होऊन बुध्दिवैभवेकडून समग्रसेवा नानाप्रयत्ने व द्रव्यसाहित्येकडून ज्यांचे त्यांपरी सजली जाऊन आपल्या विचारात घेऊन, राजश्री परशराम पंडित प्रतिनिधी व खंडेराव दाभाडे व मानसिंग मोरे यास आपणाजवळी आणावयाचा विचार कल्पून त्यांस आणून एकाग्रतेने संपूर्ण स्वामीचे राज्य स्वामीचे सेवेशी तत्पर केले. आणि आपले कर्तेपणा प्रगट करून जाधवरावांचा संकल्प सिध्दीते पाठविला, ही गोष्ट काही सामान्य केली नाही. ते तुमची दीर्घदृष्टी व आंगेजणी व बुध्दीचे वैभव व शूरत्वाचा प्रसंग चित्तात मनन करून पाहता दुसरी साम्यता असे नाही. अतएव स्वामीच्या राज्याचा अभिमान श्रीस संपूर्ण आहे व जाधवराव यांनी कैलासवासी स्वामीची सेवा त्रिकर्ण शुध्दीने करून संपूर्ण कृपा संपादली होती, तद्योगे तुम्हासारिखे बुध्दि प्रगल्भ, पराक्रमी पुत्र त्यास होऊन स्वामीचे सेवेशी तत्पर जाहले. हे कडून स्वामींनी राज्यातील दुही विशेष मानून, संपूर्ण पृथ्वीत स्वामीचे शासन चाललेच असे मनात आणून तुमच्या भरोशाने स्वामी निश्चिन्त आहेत. तद्नुरूपच तुंम्ही साताारिया खाले येऊन निग्रह करावा आणि राज्यातील दुही नाहीशी करावी. ऐशा विचारे फौजानिशी येत आहा ती गोष्टीची त्वरा करून, योजिला मानस हा पराक्रमेकडून अल्प काले सिध्दीने पाववून पुढे अनुपदेंकडून ताब्राकांत राज्य साधावे. एकाग्रता होय ते करणे आणि

संतोषाचे वर्तमान हुजूर लिहून पाठविणे. स्वामींनी खुशाली केली पाहिजे म्हणून तुम्ही इर्षे करून लिहिले तरी यापेक्षा दुसरा संतोष काय आहे ? तुमच्या विनंती पत्राचा लेखानार्थ श्रवण होताच स्वामीनी तोफांचे आवाज करवून खुशाली कर्तव्य ते बहुत केली. राजश्री परशराम पंडित प्रतिनिधी यांस स्वामींच्या चरणां वितिरिक्त दुसरा निजध्यास नाही. त्यांचे अंतरी हाच मानस होता. तो श्रीकृपे अविघ्नतेने घडला. आणि त्यांनी आपण एकरुप होऊन गड किल्ल्यास पत्रे पाठविली. पंडित मशारनिल्हे स्वामीचे मायेचेच सेवक आहेत. स्वामींच्या राज्याभिवृध्दी विशी त्याही बहुत श्रम केले आहेत. अपात्रेकरून त्यांस दया झाला होता. तेही राजश्री जाधवराव यांनीच त्यांचा अभिमान धरुन संकटातून रक्षिले, त्यामागे तुम्ही त्यास अंतर व दितरे. हा सविस्तर प्रसंग तुमचे मायेचा पंडित मशारनिल्हे यांणी हुजून लिहिला होता. तदनुरुप स्वामींनी त्यास समाधानयुक्त पत्र विस्तारे पाठविले आहे. गड किल्ले यांस त्यांही तुम्ही पत्रे पाठविली ही गोष्ट उत्तम केली. ते तुम्ही अखत्यारीव सेवक आहां. पुढेही ज्यास जे लिहिणे ते लिहिणे ते लिहून समस्त स्वामींच्या पायाशी एकनिष्ठेने वर्तन ते करणे. स्वामीनीही हुजरुन गड किल्ल्यास व हशम लोकांस पत्रे पाठविली आहेत. राजश्री हैबतराव निंबाळकर सलष्कर यांची चित्तवृत्ती स्वामीचे चरणी सुदृढ आहे. स्वामींनी मशारनिल्हेस समाधानपत्र पाठविले पाहिजे म्हणून तरी त्यांचे बाप राजश्री हणमंतराव होते. त्यांणी कैलासवासी स्वामीचे वेळेपासून त्यांची व स्वामींची सेवा निष्ठेने करुन स्वामींची कृपा बहुतच संपादून घेतली होती. हे प्रसिध्द आहे. त्यामागे मशारनिल्हे यांनीही आपली माया स्वामीस बहुतच लाविली आहे. त्यांचे सर्वप्रकारे स्वामींस अगत्य आहे. हल्ली तुमच्या लिहिण्यावरुन स्वामींनी त्यांस समाधान पत्र सादर केले आहे. राजश्री रावजी थोरात व खंडेराव दाभाडे व संताजी पांढरे यांणी येप्रसंगी बहुतच कसला करुन कार्याची प्रघटना केली. यांस समाधान पत्रे पाठवावी. स्वामी धनी आहेत. म्हणोन तरी मशारनिल्हेंनी सेवाधर्म-सहित उत्तमपणास योग्य तोच प्रसंग चित्ती धरुन तुमच्या चित्ताने ठायी

एकस्म होउन महत्कार्य संपादिले. येणे करून स्वामी त्जावरी संतुष्ट आहेत. त्यांचीही विनंतीपत्रे हुजूर आली होती. त्यांनी तुमच्या कर्तव्याचा प्रसंग बहुतच विशदे लिहिला आहे. तरी ते सेवक लोभ करून चालवावे असेच आहेत. स्वामींनी त्याय चित्तानुरूप समाधान पत्रे पाठविली आहेत. वरकडही तुमच्या लिहिण्याप्रमाणे राजश्री मानसिंग मोरे, राजश्री शहाजी निंबाळकर, हणामोजी नाईक निंबाळकर व मिरिजी पवार आदिकरून कुल सरदारास समाधान पत्रे व नांवास जागेवून पत्रे पाठवावी. आज्ञा केली पाहिजे म्हणोन लिहिले. त्याप्रमाणे समाधान पत्रे पाठविली आहेत. समस्तास देउन दिलासे करणे. अत:पर कोणी सेवक लोकीं विलक्षण कलागती करून घडोन आल्या आचरणाचा संशाय मनांत आणावा असे नाही. मध्ये कांही दिवस कालाची कुटिल गति होती. अन्यथा तुंम्हासारिख्या सेवक लोकांस आणि स्वामीच्या पायांचा वियोग हाणे होतो की काय ? याकरिता स्वामींच्या चित्ती कोणा एकाचे वैषम्य की संदेह नाही. अवघ्याही तुमच्या विचारे स्वामी कार्याची आंगेजणी करून कार्यसिध्दी करावी. अशीच स्वामींनी अवधियांस आज्ञापत्री आज्ञा केली आहे. या उपरी शीघ्रतेने चित्तानुरूप स्वामीकार्य सिध्दीते पाववून संतोषाचे वर्तमान लिहून पाठविणे. तुंम्ही वंशजपणास जे गोष्टी संपादून कीर्तिस पात्र जाला, त्या सर्व गोष्टीने मातोश्री साहेब व स्वामीही बहुत संतोषी जाहले. या उपरी दुसरे जे कर्तव्य तुंम्ही लिहिले ते नि:शेष करून स्वामी संतोषाचे वर्तमान लिहून पाठवून द्यावे. बहुत काय लिहिणे तरी तुंम्ही सुज्ञ असा " [१५]

प्रस्तुत पत्र ताराबाईने चंद्रसेन [जयसिंग] जाधवराव यास त्याने ताराबाईस १३ ऑगस्ट १७११ रोजी पाठविलेल्या पत्राचे उत्तर म्हणून पाठविले होते. [१६]

या पत्रात परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी यांच्या संबंधी बराच मजकूर आहे. त्या मजकुरावरून परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी सुध्दा चंद्रसेन जाधवाचे

शाहू विरुध्द रचलेल्या मोठया कटामध्ये सामील होते हे स्पष्ट होते. या पत्रात चंद्रसेन ताराबाईस लिहितो की, मी परशुरामपंत यांनी मुख्य पुढाकार घेऊन आपल्या सहयानिशी गुप्त पत्रे गडकिल्ल्यास पाठविली आहेत व पुढे तो म्हणतो - " आता साता-यावर चाल करुन ते स्थळ हस्तगत करण्याचा उद्योगांत आहो " म्हणजे परशुराम त्र्यंबकाने छ.शाहूंचा प्रतिनिधी म्हणून काम करीत असताना त्याच्या विरोधी स्वत:च्या सहीची पत्रे गडकिल्ल्यास पाठविली असे दिसते.

या शिवाय या पत्रातील पुढील मजकूर अतिशय महत्वाचा आहे की ज्याच्यावरुन परशुराम त्र्यंबक प्रतिनिधीचे मन ताराबाईकडे ओढ घेत होते असे म्हणता येईल. ताराबाईने चंद्रसेन जाधवास लिहिले " राजश्री परशाराम पंडित प्रतिनिधी यांस स्वामीच्या चरणावितिरिक्त दुसरा निजध्यास नाही. त्यांचे अंतरी हाच मानस होता. तो श्रीकृपे अविघ्नतेने घडला. आणि त्यांनी आपण एकस्म होऊन गडकिल्ल्यास पत्रे पाठविली. पंडित मशारनिल्हे स्वामींचे मायेचेच सेवक आहोत. स्वामींच्या राज्याभिवृध्दी विशी त्यांही बहुत श्रम केले आहेत. अपायेकरुन त्यांस दया झाला होता. तेही राजश्री जाधवराव यांणीच त्यांचा अभिमान धरुन संकटातून राहिले [सातारा किल्ल्यावर कैद झाला तेव्हा] त्यामागे तुंम्ही त्यास अंतर न दिल्हे. हा सविस्तर प्रसंग तुमचे मायेचा पंडित मशारनिल्हे यांणी हुजूर लिहिला होता."

येथे चंद्रसेन जाधवाच्या परशुराम त्र्यंबक प्रतिनिधीवर असलेल्या मायेचा व चांगल्या संबंधाचा सविस्तर वृत्तांत पंतानी ताराबाईस कळविला. होता असे ताराबाई म्हणते आहे. यावरुन परशुरामपंत प्रतिनिधीचा ओढा कोणाकडे होता व चंद्रसेन जाधव व पंतप्रतिनिधी यांचे संबंध कसे होते हे चांगलेच स्पष्ट होते. त्यामुळेच चंद्रसेन जाधवाने शाहू विरुध्द जो कट रचला त्यात भले भले मराठा सरदार व परशुराम पंडित प्रतिनिधीही सामील

झाले असावेत असे म्हणावे लागते. हा कट चंद्रसेन जाधवाने अनेकांच्या मदतीने रचला होता. त्यामुळे त्यांची माहिती छ.शाहू महाराजांना मिळाली नसेल असे म्हणवत नाही. या बातमीमुळे शाहू महाराजांचे मन परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी विषयी साशंक झाले असावे.

ज्या चंद्रसेन जाधवाने पुढाकार घेऊन हा सर्व कटाचा खाटाटोप केला त्याची निष्ठा ताराबाई चरणी सुध्दा कायम नव्हती. तो मोगलाचा हुशार सुभेदार दाऊदखान पन्नी याच्या जाळ्यात अडकला होता. त्यांने मोगलांकडे जाण्याचे निश्चित केले होते. पण उघडपणे धनाजी जाधवाच्या पुत्राने आजपर्यंत शत्रू असेलेल्या मोगलांना मिळणे गैर दिसले असते म्हणून शाहूवर रुसून ताराबाईकडे जाण्याचे ढोंग त्यांने काही काळ केले व तसे इतर सर्व मराठा सरदारांना भासवले. मोगलांकडे जाण्याचा आपला अंतरीचा हेतू तो कोणाजवळच बोलला नाही.[१७] चंद्रसेन जाधवास बाळाजी विश्वनाथाचा कमालीचा मत्सर वाटत होता. त्यातच अतिशय क्षुल्लक अशा हरणाच्या तंटयावरुन चंद्रसेन जाधवास निमित्त मिळाले. छ.शाहू बरोबर उद्दटपणे वर्तणूक करुन तो उघड उघड बंड करुन मोगलांना जाऊन मिळाला.

याच काळात चंद्रसेन जाधवाचे अनुकरण काही मराठा सरदारांनी केल्यामुळे बंडाचा फैलाव झाला. ताराबाईच्या सरदारांनीही आक्रमक धोरण स्वीकारले. ताराबाईच्या सरदारांपैकी परशुराम त्र्यंबक प्रतिनिधींचा ज्येष्ठ पुत्र कृष्णाजी परशुराम, की जो ताराबाईचा प्रतिनिधी झाला होता, त्याने ही आपली फौज घेऊन छ.शाहू महाराजांच्या प्रदेशात दंगा केला.[१८] हा वृत्तांत शाहू महाराजांना समजताच अगोदरच साशंक असलेल्या शाहू महाराजांना वाटले की परशुरामपंतानी आपल्या मुलास फूस असल्याशिवाय हा दंगा झाला नाही. त्यामुळे शाहू महाराजांचा क्रोध अनावर होऊन त्यांनी २० नोव्हेंबर १७११ रोजी परशुराम त्र्यंबक प्रतिनिधीस कैद करुन त्याचा सर्व सरंजाम जप्त केला व त्याचे डोळे काढण्याची शिक्षा फर्मावली.[१९]

चंद्रसेन जाधवांने केलेल्या कटामध्ये परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी सामील असावा असा संशय शाहूस होताच. त्यातच त्याचा पुत्र कृष्णाजी परशुराम यांने छ.शाहूच्या ताब्यात असणारा विशाळगड बंडावा करुन घेतला व ताराबाईच्या प्रदेशात सामील केला. याचा भयंकर क्रोध येऊन शाहू महाराजानी परशुरामपंतास कैद करुन त्याचा सर्व सरंजाम जप्त केला व त्याचे डोळे काढण्याची शिक्षा दिली. परंतु यावेळी खंडोबल्लाळ चिटणीस यांनी तत्परता दाखवून व मध्यस्थी करुन ती शिक्षा रद्द करण्यासाठी छ.शाहूना परावृत्त केले. त्याची हकीकत मोठी मनोरंजक आहे. त्या संदर्भात अ.ना.भागवत आपल्या ग्रंथात म्हणतात -

" त्यांनी समक्ष प्रतिनिधीस आणिले. आणि डोळे काढावे ऐसा मनांत आवेश येऊन जेठी पेलवान बोलावून आज्ञा केली जे तक्ता उरावर ठेऊन डोळे काढावे. ते समयीं जवळ लोक होते. त्यांची कोणाची शक्ती रदबदली करण्याची न होय. जेठीने तक्ता आणून उंरावर ठेवीला, आणि पाय दिला. दोनप्रहरचा समय जवळ मातबर मुत्सदी कोणी नाही. अशांत खंडोबल्लाळ चिटणीस घरी स्नान करीत होते. त्यास हे वर्तमान समजताच तसेच धावून येवून, जेठीने उरावर गुडघ्यावसा पाय दिला होता तो पाहून आधी जेठीस मागून धरुन त्यास माघारें पाडले. शरीरेकरुन बलाढयही होते. तसेच पुढे जाऊन महाराजांस साष्टांग नमस्कार घालून हात जोडून उभे राहिले आणि विनविले जे, मी सर्व प्रकारे अपराधी आहे. आधी माझे डोळे काढणे किंवा शिरच्छेद करण्यास हुकूम व्हावा, नंतर प्रतिनिधींचे पाहिजे तसे पारिपत्य करण्यास आज्ञा व्हावी. ते समयी महाराजास क्रोध न साटे उत्तर न करितां उठोन माजघरात गेले. क्षण एक उभे राहून पुन्हा दारांत येऊन बालले जे, काय म्हणाता ? सर्वांग, ओठ कंपायमान क्रोध सावरेना असा आला, तेंव्हा यांनी पुन्हा विनंती केली जे, महाराज, ब्राह्मणास इतका उग्र दंड होऊ नये. पूर्वी संभाजी महाराजांनी केले त्या योगे राज्याची व्यवस्था कशी झाली ?

हे सर्व स्वाती जाणून आहेत, यास्तव मी आज्ञेशिवाय जेठीस उठविले हा अपराध माझा झाला असे बोललेवरी पुन्हा महाराज " काय करावे ते सांगा" असे बालले. तेव्हा विनंती केली जे, "परशुरामपंतासारखे पराक्रमी सेवक माणूस असे मारू नये." मोठे अघटित कामावर घालून मारावे. ही रदबदली पाहून वांचविले. बेडी घालावी, कैदेत घालावे. यावरून बेडी आणवून घालण्यास आज्ञा झाली. ते आणविली नंतर आणखी विनंती केली की, सरकारचे प्रतिनिधी यांपरते दुसरे कोणी मोठे नाही. यास रूप्याची बेडी असावी. ते घालावी, अशी आज्ञा जालियावरि मोठया रूप्याच्या साखळया घालून किल्ल्यावर सर्व तजविजकरून भोजनाची वगैरे तरतूद बहूत चांगली ऐसे राखून ठेविले. नंतर किल्ल्यावर घातिले."[२०]

## पुन्हा छ.शाहूचे प्रतिनिधी :

परशुराम त्र्यंबक प्रतिनिधीस कैदेत टाकल्यानंतर ते पद नारायण प्रल्हाद यास मिळाले. त्याच्या कारकीर्दीतील छत्रपती, पेशवा व प्रतिनिधी यांच्या मुद्रा करून पाठविलेली काही आज्ञापत्रे मिळतात. त्यावर त्यांची मुद्रा ही मिळते. असेच एक आज्ञापत्र देशमुख व देशकुलकर्णी तार कुडाल यांना व दुसरे त्याच विभागातील मौजे आखाडेचा मोकदम [पाटील] यांना इ.स. ३ मार्च १७१२ रोजी लिहलेले आढळून येते.[२१]

तथापि नारायण प्रल्हाद प्रतिनिधी यांचेकडे हे प्रतिनिधी पद फार काळ टिकले नाही. श्री. व्ही.जी. भिडे यांच्या मते नारायण प्रल्हाद प्रतिनिधीने या पदावर एक वर्षच काम केले.[२२] नारायण प्रल्हाद प्रतिनिधी-कडून एक वर्षभराच्या आतच हे पद अवचित बाबूराव हणमंते यांच्याकडे आले.[२३] हे प्रतिनिधीपद अवचित बाबूराव हणमंते यांचेकडे सुध्दा फार काळ टिकले नाही. काही महिन्यातच ते पद पुन्हा या पदावर बराच काळ काम केलेल्या व अनुभवी असलेल्या परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी यांच्याकडे आले.

परशुराम त्र्यंबकाची सुटका :

इ.स. १७११ मध्ये चंद्रसेन जाधवाच्या चिथावणीने शाहूभोवती संकटाचे मोहोळ निर्माण केले. हे या काळातील छ.शाहू महाराजांच्यावर आलेले सर्वात मोठे अरिष्ट होते. याच्या मुळाशी मोगली सरदार दाऊदखान पन्नी हा होता. त्यास मराठयांच्यात फूट पाडून त्यांची सत्ता काही काळ कुमकुवत करण्यात यश आले. ताराबाईने या संकटात भर घातली. छ.शाहूवर नाराज झालेल्या अनेक व्यक्ती यात सामील झाल्या. तथापि बाळाजी विश्वनाथाच्या चतुराईने आणि छ.शाहू महाराजांच्या उदार अशा धोरणामुळे काही काळातच त्या सर्वांवर छ.शाहूनी मात केली. यापैकीच खटावचा कृष्णराव खटावकर याचा बंडावा हे एक प्रकरण होय.

छ.संभाजी महाराजांच्या वधा नंतर मोगलांना मिळालेल्या अनेक मराठा सरदारापैकी कृष्णराव खटावकर हा एक होता. औरंगजेबाने त्यास खटावची जहागीर दिली होती. नंतर त्याने खटाव येथे कोट बांधून घेतला व तेथेच तो फौज बाळगून बंदोबस्ताने राहू लागला. त्याला मोगलांकडून महाराजा अशी पदवी मिळाली होती.[२४] तो मोगलांना आपले धनी समजत असे व त्यांचा मनसबदार म्हणूनच काम करत असे. मोगलांचा दक्षिणेतील सरदार दाऊतखान पन्नी याच्या चिथावणीने तो शाहू महाराजांच्या प्रदेशाला वारंवार उपद्रव करीत असे. त्यासाठी तो स्वत:ला वरवर ताराबाईच्या पक्षाचा म्हणवीत असे. खटाव साताराच्या पूर्वेस सुमारे तीस मैलावर असल्यामुळे शाहूच्या राजधानीस खटावकरांचा धोका निर्माण झाला होता. म्हणून छ.शाहूने कृष्णराव खटावकर या बंडखोर ठाणेदारावर सर्वात प्रथम मोहीम काढावयाचे ठरवून खटाव मोहीमेची सर्व जबाबदारी सेनाकर्ते बाळाजी विश्वनाथ यांच्यावर सोपविली. कृष्णराव खटावकरांवरील मोहिमेची तयारी सुरू झाली याची बातमी साताराच्या किल्ल्यात नुकतीच शाहूची गैरमर्जी होऊन कैदेत पडलेल्या

परशुराम त्र्यंबकास समजली. परशुराम त्र्यंबकास आपली सुटका करुन घेण्याची विवंचना लागून राहिली होती. कृष्णराव खटावकरांवरील मोहिमेत शाहू महाराजांची मर्जी प्रसन्न करुन आपली सुटका करुन घेण्याची एक संधी आहे असा त्याने विचार केला. त्याने आपला पुत्र श्रीपतराव यास कळविले की, " तुम्ही सेनाकर्ते यांजबरोबर जाऊन लढाईची शार्य करावी. आणि महाराजांस संतोष करुन आंम्हास सोडवावे अगर मरुन जावे." [२५]

श्रीनिवास उर्फ श्रीपतराव यास जेव्हा आपल्या वडिलांचा हा निर्वाणीचा निरोप मिळाला तेव्हा छ.शाहू महाराजांच्या परवानगीने तो सेनाकर्ते बाळाजी विश्वनाथाच्या फौजेत आपल्या जमावासह सहभागी झाला. बाळाजी विश्वनाथाने अचानक खटाववर हल्ला केला. खटावकर व बाळाजी विश्वनाथ यांच्यात निकराची लढाई झाली. या लढाईत कृष्णराव खटावकर आणि त्याचा थोरला मुलगा ठार झाले [२ डिसेंबर १७११]. कृष्णरावच्या फौजेचा मोड होऊन छ.शाहूच्या फौजेचा विजय झाला. कृष्णराव खटावकरांची धाकटी दोन्ही मुले छ.शाहूस शरण आली. या युध्दात श्रीनिवास उर्फ श्रीपतराव परशुराम याने फार मोठा पराक्रम केला. [२६] कृष्णराव खटावकराच्या मुलांना शाहू महाराजांनी क्षमा करुन खटाव गांव त्याना इनाम करुन दिला.

कृष्णराव खटावकराबरोबर झालेल्या लढाईत " श्रीपतराव यांनी बहुत मर्दुमकी करुन तरतुदीने लढाई केली " अशी बाळाजी विश्वनाथाने छ.शाहूजवळ श्रीपतरावची तारीफ केली. श्रीपतरावावर महाराजाची मर्जी प्रसन्न झाली. दरबार भरवून शाहू महाराजांनी श्रीपतरावचा मोठा सन्मान केला. श्रीपतरावाच्या या पराक्रमामुळे परशुराम त्र्यंबकाविषयी छ.शाहूची झालेली गैरमर्जी दूर झाली. त्याच्या विषयी शाहू महाराजाची असलेली साशंकता नष्ट झाली. त्याचे मन परशुराम पंता विषयी साफ झाले.

श्रीपतरावावर शाहू महाराज प्रसन्न झाल्यामुळे त्यास मागणे मागण्यास त्यांनी सांगितले. तेव्हा श्रीपतरावने " आमची प्रतिनिधी पदवी आम्हास मिळावी. विशाळगडचा किल्ला कोल्हापूर राजधानीतील. तो मुलुख सुध्दा तिकडील प्रतिनिधी कृष्णाजी पंत याजकडे चालवावा." [२७] अशी मागणी केली. छ.शाहू महाराजांची श्रीपतरावाच्या दोन्ही मागण्या मान्य केल्या. परशुरामपंताकडून येथून पुढे निष्ठेने व प्रमाणिकपणे वागण्याची खातरजमा करुन घेउन मगच त्यास पद दिले जाईल असे सांगितले. खंडोबल्लाळ चिटणीस आणि बाळाजी विश्वनाथ यांनी परशुरामपंताच्या बरोबर खातरजमेची बोलणी करुन त्यांच्याकडून शपथ व प्रमाण घेतले व त्यांची कैदेतुन मुक्तता केली. त्यांना कोणतेही पद कैदेतुन मुक्त झाल्या झाल्या दिले नाही. तसे यावेळी कोणतेच पद रिकामे नव्हते.

पुढे इ.स. १७१३ मध्ये पुन्हा एकदा शाहू महाराजांवर चहूकडून संकटाचे मोहोळ उठले. निजामउल्मुल्क दक्षिणेच्या मोगली सुभ्याच्या कारभारावर रुजू झाला. त्याने अंतस्थ कारस्थाने करुन छ.शाहूस शह देण्यास सुरुवात केली. शाहूच्या प्रदेशात गडबड उडवून दिली. शाहूकडे पैसा नव्हता. कर्त्या माणसाचीही कमतरताच होती. सेनाकर्ते बाळाजी विश्वनाथ झटून काम करीत होता. या काळात मुख्य पेशव्याचा आधार तर तो ना कर्ताच होता. शिवाय जो अलीकडेच आंग-याच्या कैदेत पडला होता. परशुराम त्र्यंबक यास छ.शाहूने श्रीपतरावाच्या पराक्रमानंतर सेवेत रुजू करुन घेतले होते. त्यास शाहू महाराजांनी आज्ञा केली - " तुम्ही पेशवाई स्वीकारा व राज्याचा बंदोबस्त करा. आंग-यांनी घेतलेले किल्ले परत मिळवा." परंतु परशुराम त्र्यंबकाने ते काम स्वीकारले नाही. त्याचे पहिले कारण म्हणजे त्याला प्रतिनिधीपद पाहिजे होते. दुसरे कारण म्हणजे आंग्रे हा बलवान, पराक्रमी सरदार असून तो सहजासहजी पराभूत करण्या सारखा नव्हता. तिसरे कारण म्हणजे - कान्होजी आंग्रेस ताराबाईचा पाठिंबा होता. त्यामुळे आंग्रेवर मोहीम उघडणे

म्हणजे ताराबाई विरुध्दच लढण्यासारखे होणार होते. म्हणून अत्यंत चाणाक्षपणे व युक्तीने त्याने अंग-यावर स्वारीस जाण्याचे टाळले. त्यासाठी त्याने बाळाजी विश्वनाथपेशव्यास पुढे केले. बाळाजी विश्वनाथ व खंडोबल्लाळ चिटणीस यांनी परशुरामपंतास त्याचे पूर्वीचे प्रतिनिधी पद देण्याविषयी शाहू महाराजाचे मन वळविले. या उभयता विश्वासूच्या आग्रहास्तव १९ जून १७१३ रोजी छ.शाहू महाराजांनी पुन: परशुराम त्र्यंबकास प्रतिनिधीपद दिले.[२८]

या घटनेवर गो.स.सरदेसाई यांनी सुंदर भाष्य केले आहे. ते म्हणतात, " या कामी [पदे मिळविण्याच्या] परशुरामपंत व बाळाजी यांनी एकमेकांची साथ चांगली केली असे दिसते. प्रथम परशुरामपंतास प्रतिनिधीपद देण्यास बाळाजीने महाराजांना भीड घातली. उपरान्त परशुरामपंताने तशीच भीड महाराजांना घालून पेशवाईपद बाळाजीस देवविले."[२९]

प्रतिनिधीपदाची सनद :

परशुराम त्र्यंबक प्रतिनिधीस यावेळी जे प्रतिनिधीपद मिळाले ते त्याच्या घराण्यात वंशपरंपरेने राहिले. छ.शाहूने प्रतिनिधिपद परशुरामपंताचे वंशात कायम राहिल अशा पध्दतीने त्यास एप्रिल १७१४ रोजी सनद करून दिली.[30] या सनदेमध्ये परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी यांच्या सुरुवातीपासूनच्या पराक्रमाचा व कामगिरीचा उल्लेख केलेला आहे. ती सनद पुढील प्रमाणे -

" स्वस्तिश्री राज्याभिषेक शाके ४० विजयनाम संवत्सरे वैशाख शुक्ल ५ गुरुवासरे क्षत्रिय कुलावंतस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी यांणी समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री परशुराम त्र्यंबक प्रतिनिधि यांसी आज्ञा केली ऐसी जे :- तुंम्ही स्वामिसन्निध विनंति केली की - तीर्थरूपस्वरूप महाराज राजाराम काकासाहेब कैलासवासी यांचे कारकीर्दीत राज्यांत बहुत श्रम साहस केले. यास्तव प्रतिनिधिपद अजरामरामत वतनी आपणास करून

दिले आहे. ते पत्र पाहून नवीन पत्र करून द्यावे म्हणोन त्याजवरून ते पत्र पाहून मनास आणितां, पूर्वी राज्यावर औरंगजेब बादशहा दक्षिणेत येऊन सातारा, परळी व विशाळगड, पन्हाळा या किल्ल्यास वेढा घालून बसले, ते समयी तुम्ही झुंझण्याची शर्थ केली. आणि पुन्हा बादशहा माघारी फिरताच श्रम जातीनिशी करून किल्ले घेतले. चंदीस महाराज गेले होते तेथे धन्याचे साहित्याची सीमा केली. तेथून साहेब देशी आल्यावर राज्य स्वाधीन केले. आणि आज्ञेप्रमाणे वर्तून एकनिष्ठपणे सेवा केली. अशी महत्कार्ये करून राज्य रक्षण केले. यास्तव तुम्हावर कृपाळूनहोऊन प्रतिनिधीचे पद तुम्हास वंशपरंपरेने वतनी करून दिल्हे असे भोसले यांचे राज्याचे वंशी जो राज्य करील त्याने तुमचे वंशाचे ठायी ममतापुरस्सर विश्वास ठेवून तुमचे वंशी पद चालवावे. यासी अंतर करील, त्यांचे राज्यास श्रेयस्कर होणार नाही. छ ४ रविलाखर सु ११ अर्बा "[३१]

या वेळेपासून म्हणजेच इ.स. १७१४ पासून पुढे मुख्यत्वेकरून छत्रपतींच्या अष्टप्रधानांची पदे वंशपरंपरेची झाली. यावेळी छ.शाहू महाराजांचे अष्टप्रधान मंडळ पूर्ण झाले. ते खालीलप्रमाणे होते.

| | | |
|---|---|---|
| प्रतिनिधी | - | परशुराम त्र्यंबक |
| १. पेशवे | - | बाळाजी विश्वनाथ |
| २. अमात्य | - | आबाराम बापूराव हणमंते |
| ३. सचिव | - | नारो शंकर |
| ४. मंत्री | - | नारोराम शेणवी. |
| ५. सेनापती | - | मानसिंग मोरे |
| ६. सुमंत | - | आनंदराव |
| ७. पंडितराव | - | मुदगलभट उपाध्ये |
| ८. न्यायाधिश | - | होनाजी अनंत. |

येणे प्रमाणे अष्टप्रधान केले.[३२]

अशा पध्दतीने परशुराम त्र्यंबक प्रतिनिधीने मराठयांच्या राज्यासाठी जे कष्ट सोसले, राज्याची जी सेवा केली त्याचे छ.शाहू महाराजांनी यथायोग्य चीज केले. येथून पुढे त्याच्यावर छ.शाहू महाराजांची अवकृपा कधीही झाली नाही. परशुरामपंत जुने माहितगार, अनुभवी व मुत्सद्दी असल्यामुळे त्यांच्या सल्ल्याचा शाहू महाराजांना चांगलाच उपयोग झाला. येथून पुढे अनेक वेळा छ.शाहू महाराजांनी परशुरामपंतावर प्रसन्न होऊन त्यांचा गौरव करून नवीन नवीन इनामे दिली.

अन्य सनदा :

१७१५-१६ मध्ये परशुरामपंत प्रतिनिधीस छ.शाहूंनी कडेवेळीत येथील सरदेशमुखी दिली. त्यावेळी जे वतन करून दिले ते पुढील प्रमाणे -

* वतन पत्र छ.१ रमजान वतन देशमुखी. प्रांत कडेवळीत येथील पूर्वी कैलासवासी राजश्री काकासाहेबी अजराम-हामत करून दिले. त्याप्रमाणे अनुभवीत आले. स्वामींनीही वतनाची पत्रे करून देऊन वतन जालविले. त्यावरी छ.२० सवाल सन इसवे मशारनिल्हेकडून स्वामीसेवेस अंतर पडिले हे सबबे अमानत करून हुजूर ठेवून जोत्याजी केसरकर यांचे स्वाधीन केले होते. ऐशीयास मशारनिल्हे स्वामींचे पुरातन सेवक या राज्यामध्ये श्रम साहस बहुतच करून राज्य अभिवृध्दीस पावविले. प्रस्तुत स्वामींची सेवा निष्ठापूर्वक करितात, यांचे वंशपरंपरा चालवणे अगत्य जाणून, स्वामी कृपाळू होऊन प्रांत मजकूरची सरदेशमुखी वतन करार करून दिले आहे. वतनाचा उपयोग करतील. या वतनास इक्कलाजिमा इनामत व हल्ली पूर्वील सनदाप्रमाणे देत जाणे. प्रतिवर्षि नूतन पत्राचा आक्षेप न करणे.[33]

परशुरामपंत प्रतिनिधी यांचे जन्म गाव मौजे किनहई संमत कोरेगांव सुभा प्रांत वाई हे गाव छ. शाहू महाराजांनी इनाम दिले त्याबाबतची अस्सल सनद -

" स्वास्तिश्री राज्याभिषेक शाके ३९ नंदन संवत्सरे श्रावण बहुल चतुर्थी मंदवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी याणी समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री परशरामपंडित प्रतिनिधी यांस आज्ञा केली ऐसिजे तुंम्ही स्वामीच्या राज्यांत श्रम-साहस बहुत करुन पायासी निष्ठा धरिली. या करिता तुम्हावरी कृपाळु होऊन मौजे किन्हई समत कोरेगांव सुभा प्रांत वाई कुलबाब कुलकानु सर्व माफ करुन खेरीज कदीम हाकदार व ईनामदार असतील ते वजा करुन तुम्हास इनाम दिल्हा असे तुम्ही व आपले वंशापरंपरेचे ईनाम अनुभवणे स्वामी तुम्हास मौजे मजकूर इनाम प्रतिवर्षी चालवितील जाणिजे बहुत लिहिणे तरी तुम्ही सुज्ञ असा." [३४]

परशुरामपंत प्रतिनिधींनी दुस-यांदा छ.शाहूचे प्रतिनिधीपद स्वीकारल्यानंतर पुन: कधीही महाराजांची त्याच्यावर गैरमर्जी झाली नाही. उलट छ.शाहू महाराजांचा दिवसेंदिवस त्यांच्यावर विश्वास वाढत गेला. परशुरामपंतानी ही आपल्या संपूर्ण दरबारी कामकाजाची जबाबदारी कर्तबगार पुत्र श्रीनिवास उर्फ श्रीपतराव यांचेवर टाकली. पुढे छ.शाहू महाराजांच्या दरबारात अनेक राजकीय उलाढाली झाल्या. त्यात परशुराम पंताचा कोठेही उल्लेख आढळत नाही. याचाच अर्थ राजकीय बाबी पासून ते जवळजवळ निवृत्त झाल्यासारखेच झाले होते. पण या काळात ते नेहमी छ.शाहू महाराजांच्या सानिध्यात सातारा येथेच राहत असत. व फक्त सल्ला-मसलतीत भाग घेत असत. त्यांचे शेवटचे दिवस असे सुखा-समाधानात चालले असतानाच त्यांना ज्येष्ठ शुध्द ८ शाके १६४० सोमवार विलंबी नाम संवत्सरे रोजी म्हणजेच २७ मे १७१८ रोजी वयाच्या ५८ व्या वर्षी मृत्यू झाला. [३५]

छ.शाहू महाराजांच्या सौजन्यशील व उदार धोरणामुळे ताराबाईने पन्हाळा येथे निर्माण केलेली मराठ्यांची दुसरी गादी टिकून राहिली. ताराबाईने परशुरामपंत प्रतिनिधीचा जेष्ठ पुत्र कृष्णाजी परशुराम यास आपले प्रतिनिधी म्हणून नेमले होते. पुढे कोल्हापूरला क्रांती होऊन ताराबाई

व तिचा पुत्र छ.शिवाजी यांना राजसबाई व तिचा पुत्र संभाजीराजे यांनी कैद करुन आपल्या हातात सत्ता घेतली. तेव्हा कृष्णाजी परशुराम यांनेही छ.संभाजी यांची बाजू घेतली. त्यामुळे पुढे त्याच्याच वंशात कोल्हापूर गादीचे प्रतिनिधीपद वंशपरंपरेने चालत राहिले. त्यांना विशाळगडाची जहागीर मिळाली होती म्हणून त्यांना विशाळगडावर प्रतिनिधी म्हणत असत.

सातारा येथे छ.शाहूची राजधानी होती. येथेही परशुरामपंत प्रतिनिधीच्या घराण्यात वंशपरंपरेने प्रतिनिधिपदाची सनद मिळाली होती. त्यामुळे त्यांच्याच घराण्यात सातारा छत्रपतीचे प्रतिनिधीपद वंशपरंपरेने राहिले.

मराठयांच्या छत्रपतीच्या दोन गादया सातारा व कोल्हापूर येथे झाल्या. तेव्हा पासून प्रतिनिधी घराण्याच्याही दोन शाखा निर्माण झाल्या. त्या म्हणजे [१] कोल्हापूरचे प्रतिनिधी [२] साताराचे प्रतिनिधी.

साताराच्या छत्रपतींचे प्रतिनिधी परशुराम त्र्यंबक होते. त्यांच्यानंतर त्यांचे पुत्र श्रीनिवास उर्फ श्रीपतराव हे प्रतिनिधी झाले व या श्रीनिवास उर्फ श्रीपतराव याच्या वंशातच साताराच्या छत्रपतीचे प्रतिनिधिपद पिढयानपिढया राहिले. हे सातारा प्रतिनिधीचे घराणे शेवटपर्यंत सातारा छत्रपतीशी एकनिष्ठ राहिले. इ.स.१८४८ मध्ये साताराचे राज्य खालसा होईपर्यंत ते सातारा छत्रपतींचे पिढीजात प्रतिनिधी होते.[३६] पण पुढे इ.स.१८४८ नंतर ब्रिटिश सरकारने सातारा प्रतिनिधी घराण्यास स्वतंत्र जहागीर वाढून दिली. छ.शाहूच्या कारकीर्दीत प्रतिनिधीना मिळालेली जहागीर पुढे पेशवाईत कमी करण्यात आली. इंग्रजांच्या राजवटीत तर ती आणखी कमी करण्यात आली. सातारा नंतर क-हाड हे प्रतिनिधी घराण्याचे प्रमुख ठाणे होते. इंग्रजांच्या काळात औंध हे गांव प्रतिनिधींच्या जहागिरीचे प्रमुख ठाणे बनले.

परशुराम त्र्यंबक प्रतिनिधीची योग्यता :

परशुराम त्र्यंबक प्रतिनिधीचा उदय छ. संभाजी महाराजांच्या वधानंतरच्या कालखंडात झाला. पण त्या अगोदरच रामचंद्रपंत अमात्याकडे त्यांनी आपल्या कारकीर्दीची सुरुवात साधा कारकून म्हणून केली होती. पुढे रामचंद्रपंतावरील निष्ठा, कामातील उरक व प्रामाणिकपणा यामुळे तो त्याच्या मर्जीत असला. रामचंद्रपंतानी त्यास मुलकी कामाच्या जबाबदाऱ्याबरोबरच लष्करी कामगिरी दिली. त्यातही त्याने आपला पराक्रम दाखवला. तेथून पुढे परशुराम पंतास सरदारकीची कामे दिली जाऊ लागली.

छ. राजारामाने सुरुवातीस त्यास " समशेर बहाद्दूर " हे पद दिले. त्यानंतर मोगलांनी जिंकलेला मुलूख सोडविणे, चंदीकडे रसद पाठवून देणे व स्वातंत्र्याचा लढा सतत चालू ठेवणे ही कामे त्याने पार पाडली. छ. राजाराम जिंजीहून महाराष्ट्रात आल्यानंतर त्यांच्या ताब्यात असणारा दक्षिण महाराष्ट्राचा भाग त्याने छ. राजारामाच्या चरणी अर्पण. केला. याच काळात त्यास मुख्यप्रधान व प्रतिनिधी ही पदे मिळाली.

औरंगजेबाने मराठयांच्या स्वराज्यातील किल्ले जिंकून घेण्याची मोहिम स्वत:च्या नेतृत्वाखाली सुरु केली. तेव्हा परशुरामपंतानी सातारा, परळी व विशाळगड हे किल्ले मोगलांविरुध्द निकराने झुंजवले. विशाळगडचा पराक्रम तर त्याच्या कारकीर्दीतील सर्व पराक्रमांवर कळस शोभावा असाच होता. या काळात त्याच्या अंगी असणारे चाणाक्षपणा, चतुराई, पराक्रम, शौर्य, हुशारी व मुत्सद्देगिरी इ. गुण दिसून आले.

ताराबाईच्या कालखंडात रामचंद्रपंत अमात्य मागे पडला. परशुराम पंत प्रतिनिधीस ताराबाईचा प्रमुख सल्लागार बनून तिच्या विश्वासास पात्र झाला. याच काळात स्वराज्याचा मोगलांनी घेतलेला प्रदेश, गड, कोट व किल्ले हे सोडविणे तसेच त्या प्रदेशात मुलकी प्रशासन कार्यक्षम करणे, धारे

बसवून सारा वसूली करणे इ. कामे परशुराम पंतानी चांगल्या प्रकारे पार पाडली.

छ.शाहू महाराजांची सुटका झाल्यानंतर त्याने निष्ठेने ताराबाईचा पक्ष घरला. त्यामुळे त्यांना कारावास भोगावा लागला. परंतु छ.शाहूने प्रतिनिधीपद मिळाल्यानंतर पुढचे आयुष्य फक्त सल्ला मसलती करण्यात गेले. त्यामुळे पुन्हा विशेष पराक्रम त्यांच्या हातून घडला नाही.

परशुरामपंत प्रतिनिधी हा ईश्वर भक्त असून आपल्या कुलदेवतेवर त्याची अढळ श्रध्दा होती. त्याने जगदंबेवर अनेक कवने रचली आहेत. तसेच साक्षात्कारी पुरूष व साधुसंत यावरही त्याची श्रध्दा असलेली दिसते. त्यास मराठी तसेच संस्कृत भाषेचे चांगले ज्ञान असावे असे त्याच्या व्यासंगावरून दिसते.

रियासतकार सरदेसाई यांनी परशुराम त्र्यंबक प्रतिनिधीच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा पुढील शब्दात घेतला आहे.

" परशुरामपंताची योग्यता ठरविण्या इतकी माहिती उपलब्ध नाही. तो चतुर व अनुभवी होता. काही दिवस त्याने पेशवेगिरीचे व अमात्याचेही काम केल्याचा उल्लेख सापडतो. त्याच्या अंगी अनेक गुण होते. ताराबाईची सेवा त्याने एकनिष्ठपणे केली. शाहू आल्यावर त्याची तारांबळ झाली आणि त्याचा पराक्रम गाजला नाही. जमीन महसुलाच्या हिशेबी कामात परशुराम त्र्यंबक फार चांगला वाकबगार होता. त्याने जमीनीची पहाणी करून वसुलाचे धारे बांधले. त्याची संस्कृत व मराठी कवने छापलेली आहेत. २७ मे १७१८ रोजी त्याचा काल झाला. त्याचे वृंदावन माहुलीस आहे. "

मराठयांच्या स्वातंत्र्य युध्दाच्या प्रारंभी परशुराम त्र्यंबक याचा एक सरदार म्हणून मराठयांच्या राजकारणात उदय झाला. त्याने मुलुखगिरी, मुत्सद्देगिरी व कारभार या बाबतचे धडे हुकमतपन्हा रामचंद्रपंत अमात्य याचेकडून

घेतले. इ.स. १६९२ ची पन्हाळ्याची मोहिम हा पंताच्या कारकीर्दीचा श्रीगणेशा होय. परशुरामपंताच्या ठाई असणा-या पराक्रम, मुत्सद्देगिरी उपजत शाहाणपण, स्वराज्यावरील निष्ठा इ. गुणामुळे प्रभावीत होऊन राजाराम महाराजानी त्यास इ.स. १६९८ मध्ये आपला प्रतिनिधी नेमले. परशुरामपंताने आपल्या संपन्न व्यक्तिमत्वाचे आणि असामान्य कर्तबगारीने प्रतिनिधीपदास मराठयांच्या राज्यकारभारात व राजकारणात प्रतिष्ठा मिळवून दिली. मराठयांच्या स्वातंत्र्य युध्द कालात त्याने स्वराज्य रक्षणार्थ केलेले श्रमसायास व मोगलांशी झुंजताना दाखविलेला असामान्य पराक्रम यास स्मरून पुढे छ. शाहूने परशुरामपंतास आपला प्रतिनिधी नेमले. इ.स. १७१४ मध्ये "प्रतिनिधीपद" त्याच्याच घराण्यात वंशपरंपरागत करून दिले. अशाप्रकारे परशुराम त्र्यंबक याने आपल्या पराक्रम आणि मुत्सद्देगिरीच्या जोरावर प्रतिनिधीपद प्राप्त केले, त्याची शान वाढविली, आणि ते आपल्या घराण्यात कायम केले.

------x------

## -: संदर्भ :-


१. सरदेसाई गो.स., मराठी रियासत "पुण्यश्लोक शाहू". पृ.६२.

२. रायभानजी भोसले, हा शाहू विषयी सुरुवातीपासून प्रेम असलेला मोगलांचा मनसबदार. तो छत्रपतींच्याच कुळातील पण अनौरस शाखेतील होता. शाहूच्या सुटकेपासून त्याचा हा प्रमुख सल्लागार होता. शाहू त्यास "रायभानजी काका" असे संबोधीत असे.

२. पारसनीस द.ब., परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी. पृ.२६.

३. भारत वर्ष - वर्ष १ ले. अंक १ ला. "पंतप्रतिनिधीची बखर" पृ.४४.

४. भागवत अ.ना., साताराच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास ग्रंथ क्र.१ पृ.२४३.

५. राजवाडे वि.का., मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड ८ वा. पत्र क्र.६१ पृ. ८१-८२-८३.

६. मेहेंदळे वा.प., प्रतिनिधी घराण्याचा इतिहास - परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी यांचे चरित्र - पृ.५७-५८-५९-६०.

७. पंतप्रतिनिधीची बखर. पृ.४५.

८. सरदेसाई गो.स., "उपरोक्त" पृ.९६.
गर्गे स.मा., करवीर रियासत. पृ.१३६.

९. पारसनीस द.ब., "उपरोक्त" पृ.२६,
मेहेंदळे बा.प., "उपरोक्त" पृ.६३.
भागवत अ.ना., "उपरोक्त" पृ.२४५.
भिडे व्ही.जी., "उपरोक्त" पृ.१२४.
सरदेसाई गो.स., "उपरोक्त" पृ. ४६, ९६.

१०. पारसनीस द.ब., "उपरोक्त" पृ.२७,
भिडे व्ही.जी., "उपरोक्त" पृ.१२५.
भागवत अ.ना, "उपरोक्त" पृ.२४५.

११. पारसनीस द.ब., "उपरोक्त" पृ.२६-२७.
मेहेंदळे वा.पा., "उपरोक्त" पृ.६३.

१२. सरदेसाईगो.स., "उपरोक्त" पृ.९७.

१३. भागवत अ.ना. "उपरोक्त" पृ.२५०-२५१-२५२.

१४. पवार आप्पासाहेब, <u>ताराबाईकालीन कागदपत्रे खंड १ ला.</u> पृ.३५६-३५७-३५८.

१५. सरदेसाई गो.स., कृ.पा.कुलकर्णी, या.मा.काळे, <u>ऐतिहासिक पत्रव्यवहार.</u> पृ.५-८
पारसनिस द.ब., "उपरोक्त" पृ.२१-२६.

१६. सरदेसाई गो.स., <u>मराठी रियासत "पुण्यश्लोक शाहू"</u> पृ.६७.

१७. कित्ता - पृ.६८-६९.

१८. पारसनीस द.ब., "उपरोक्त" पृ.२७,
मेहेंदळे वा.प., "उपरोक्त" पृ.६४.

१९. कित्ता - पृ.२७, कित्ता - पृ.६४.
सरदेसाई गो.स., "उपरोक्त" पृ.७१,
गर्गे स.मा., "उपरोक्त" पृ.१३६.

२०. भागवत अ.ना., "उपरोक्त" पृ.२६२-२६३.

२१. भा.इ.सं. मंडळ, पुणे. त्रैमासिक. वर्ष ३३-३४ अंक ३-४ व १-२. पृ.१०-११.

२२. भिडे व्ही.जी., "उपरोक्त" पृ.१२५.

२३. पारसनीस द.ब., "उपरोक्त" पृ.२८.

२४. गर्गे स.मा., "उपरोक्त" पृ. १४६,

Brij Kishore - Tarabai & Her Times. P.135.

२५. सरदेसाई गो.स., "उपरोक्त" पृ.७३-७४.

भागवत अ.ना., "उपरोक्त" पृ. २६९.

२६. सरदेसाई गो.स., "उपरोक्त" पृ.७४,

गर्गे स.मा., "उपरोक्त" पृ. १४६.

२७. पंतप्रतिनिधीची बखार - पृ. ४६.

२८. सरदेसाई गो.स., "उपरोक्त" पृ.९८.

२९. कित्ता - ९४.

३०. कित्ता - ९८.

३१. राजवाडे वि.का., म.इ.साधने खंड २ रा. पृ. १९-२०.

३२. पंतप्रतिनिधीची बखार. पृ. ४७.

३३. आपटे द.वी. व प्रा.ओतुरकर र.वि.[संपा]

महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास. पृ. ८३.

पारसनीस द.ब., "उपरोक्त" पृ. ३१.

३४. मेहेंदळे वा.प., "उपरोक्त" पृ. ६७.

३५. पारसनीस द.ब., "उपरोक्त" पृ. ३१.

३६. कित्ता - पृ. ३२.

.....